**Prabhat Kids School, Akola** **2025-26**
(CBSE Affiliation No. 1130426)

Std.VIII Section : ____________ Subject : Marathi Marks : 80

Date : ______________ Term - I

Name :__________________________________________ Roll No. ____________ Time : 3 Hrs.

## विभाग अ - (अपठित उतारा)

**प्रश्न १ अ) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

सण आणि उत्सव हा माणसाच्या जीवनातला एक महत्त्वाचा घटक आहे. भारतीय संस्कृतीमध्ये वर्षाच्या प्रत्येकच महिन्यात कुठला ना कुठला सण येतोच. प्रत्येक सण साजरा करण्याची पद्धत त्यावेळच्या ऋतूशी जोडलेली असते. जसे हिवाळ्यात येणाऱ्या संक्रांतीच्या सणाला थंडीच्या ऋतूनुसार तिळगूळ किंवा गूळपोळ्या बनवण्याची प्रथा आहे. या सणांमुळे आपल्या नेहमीच्या दैनंदिन जीवनात काही वेगळेपणा येतो. सणासुदीने घराघरांमध्ये उत्साह व आनंद ओसंडून वाहत असतो. या निमित्ताने नवीन खरेदी होते, गोडधोड व रुचकर पदार्थांची लयलूट होते. सण साजरे करण्यामागचा सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे नात्यानात्यांतील प्रेमात येणारी दृढता. रक्षाबंधनासारखे सण भाऊबहिणीच्या नात्यात मायेची गोडी वाढवतात, जीवनात नवचैतन्य, उत्साह भरणारे, आनंदाची उधळण करणारे, नात्यानात्यांतील प्रेम दृढ करणारे हे सण आपल्या जीवनातील विसाव्याचे ठिकाणच आहेत.

भारत देश हा प्राचीन काळापासून कृषीप्रधान असल्याने सर्व सण उत्सवांची रचना ही बदलत्या ऋतूप्रमाणे केली आहे. सतत बदलणा-या ऋतूप्रमाणेच जर आपण आपल्या आहारात सुद्धा बदल केला तर आपले आरोग्य हे अर्थातच चांगले राहते, त्यामुळे त्याच पद्धतीने भारतीय सणांची रचना केली आहे. आपले सण-उत्सव हे चंद्रावर अवलंबून असतात तर ऋतू हे सूर्यावर अवलंबून असतात.

Sample Paper Prabhat Kids School, Akola

**अ) दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय शोधून उत्तरे लिहा. (कोणतेही ५)** **५ गुण**

१) कोणत्या संस्कृतीमध्ये वर्षाच्या प्रत्येकच महिन्यात कुठला ना कुठला सण येतोच?

अ) वैदर्भीय  ब) मराठवाडा  क) पाश्चिमात्य  ड) भारतीय

२) कशाने घराघरांमध्ये उत्साह व आनंद ओसंडून वाहत असतो?

अ) पध्दतीने  ब) सणासुदीने  क) आनंदाने  ड) प्रयत्नाने

३) कोणता सण भाऊबहिणीच्या नात्यात मायेची गोडी वाढवतो?

अ) गुढीपाडवा  ब) दसरा  क) रक्षाबंधन  ड) दिवाळी

४) आपल्या सर्व उत्सवांची रचना ही कशाप्रमाणे केली आहे?

अ) मुहूर्ताप्रमाणे  ब) वेळेप्रमाणे  क) ऋतूप्रमाणे  ड) पद्धतीप्रमाणे

५) आपले सण उत्सव हे कशावर अवलंबून असतात?

अ) ग्रहावर  ब) चंद्रावर  क) पंचांगावर  ड) वेळेवर

६) प्राचीन काळापासून भारत देश कसा आहे?

अ) उद्योग प्रधान  ब) कृषिप्रधान  क) राजकारणी  ड) युद्ध प्रधान

**आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ३)** **३ गुण**

१) माणसाच्या जीवनातला एक महत्त्वाचा घटक कोणता आहे?

२) प्रत्येक सण साजरा करण्याची पद्धत कशाशी जोडलेली असते?

३) हिवाळ्यात येणाऱ्या संक्रांतीच्या सणाला थंडीच्या ऋतूनुसार कोणते पदार्थ बनवण्याची प्रथा आहे?

४) आपल्या आयुष्यातील विसाव्याचे ठिकाण कोणते?

**प्रश्न २ : खाली दिलेली अपठित कविता वाचून त्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे सोडवा.**

जाऊ फुलांच्या जगात
जाऊ फुलांच्या जगात
ऐकू फुलांची गाणी
पाखरांच्या संगतीत
गुजगोष्टी करू रानी ||

निर्झराचे गोड गीत
ऐकू चला वाऱ्यावर
खेळू सोनेरी उन्हात
हिरव्याशा तृणावर ||

शोधू निळ्या आकाशात
इंद्रधनुची कमान
दिसते का पाहू कोठे
रम्य विजेचे नर्तन ||

चंद्र, सूर्य, तारकांचा
शोध घेत चला जाऊ
पाठलाग करताना
कोण पुढे जाते पाहू ||

सूर्यकांत खांडेकर.

Sample Paper
Prabhat Kids School,
Akola

**अ) दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय शोधून उत्तर लिहा. (कोणतेही ४)** **४ गुण**

१) कवींना कोणाच्या जगात जायचे आहे?

अ) फळांच्या ब) मुलांच्या क) फुलांच्या ड) तणांच्या

२) निर्झराचे गोड गीत कवी कुठे ऐकणार आहे?

अ) पानावर ब) नदीवर क) वाऱ्यावर ड) आकाशावर

३) कवी निळ्या आकाशात कशाची कमान शोधणार आहे?

अ) फुलांची ब) मनांची क) इंद्रधनुची ड) विजेची

४) कवितेत पाखरांच्या संगतीत काय करायचे आहे?

अ) मागोवा    ब) सारांश    क) गुजगोष्टी    ड) पाठलाग

५) कवितेत 'चांदण्या' साठी आलेला शब्द कोणता?

अ) पाखरा    ब) निर्झरा    क) तृणा    ड) तारका

**आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ३)** **३ गुण**

१) कोणाच्या संगतीत कवी गोष्टी करणार आहे?

२) कवींना सोनेरी उन्हात कशावर खेळावं वाटते?

३) आकाशात कवी कोणाचे नर्तन शोधत आहे?

४) जाऊ फुलांच्या जगात या कवितेचे कवी कोण?

## विभाग - ब (व्याकरण)

**प्रश्न ३ : दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**अ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही ३)** **३ गुण**

Sample Paper Prabhat Kids School, Akola

१) जंगलात भरपूर **प्राणी** पाहिले. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) धातू साधित नाम    ब) विशेष नाम    क) सामान्य नाम    ड) भाववाचक नाम

२) बंड्र नावाचा एक गरीब मुलगा होता. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

अ) नाम    ब) सर्वनाम    क) विशेषण    ड) क्रियापद

३) सुजय प्रामाणिकपणे अभ्यास करतो. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) नाम    ब) सर्वनाम    क) विशेषण    ड) क्रियापद

४) खालीलपैकी सामान्य नामाचा योग्य पर्याय कोणता?

अ) गंगा    ब) राधा    क) इमानदारी    ड) शहर

**आ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही ३)** **३ गुण**

१) तू आत्ता गावी जायला हवे. (वाक्यातील सर्वनाम ओळखा)

अ) गावी    ब) आत्ता    क) हवे    ड) तू

२) ही बाहुली आरतीची आहे. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) पुरुषवाचक सर्वनाम    ब) दर्शक सर्वनाम

क) प्रश्नार्थक सर्वनाम    ड) आत्मवाचक सर्वनाम

३) _______________ अभ्यास झालाच नव्हता. (योग्य पर्याय वापरून वाक्य पूर्ण करा)

अ) त्याचा    ब) तिला    क) मला    ड) तो

४) __________ सगळे मिळून काम करू. (योग्य पर्याय वापरून वाक्य पूर्ण करा)

अ) त्याचे    ब) आपण    क) मी    ड) त्याला

**इ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही ३)** **३ गुण**

१) ताईने मला कोरडे कपडे दिले.(वाक्यातील विशेषण ओळखा)

अ) ताईने ब) कपडे क) कोरडे ड) दिले

२) अनन्याने <u>गोड</u> आंबे खाल्ले. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण ड) क्रियापद

३) सरिता <u>सुमधुर</u> आवाजात गाते. (विशेषणाचा प्रकार ओळखा)

अ) गुणवाचक विशेषण ब) संख्यावाचक विशेषण

क) सार्वनामिक विशेषण ड) संबंधी विशेषण

४) मैदानात <u>पुष्कळ</u> पाणी साचले. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण ड) क्रियापद

**ई) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही ३)** **३गुण**

१) विनयला गोड फळे आवडतात. (वाक्यातील क्रियापद ओळखा)

अ) फळे ब) गोड क) आवडतात ड) विनयला

२) तो धावत परत शाळेत..........(योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण करा)

अ) मिळतो ब) होता क) आला ड) आहे

३) रस्त्यात वाघ आडवा <u>येईल</u>. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण ड) क्रियापद

४) तुषारने मोठा चेंडू घेतला. (वाक्यातील क्रियापद ओळखा)

अ) मोठा ब) घेतला क) चेंडू ड) तुषारने

Sample Paper
Prabhat Kids School,
Akola

**प्रश्न ४ : अ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही २)** **२ गुण**

१) 'थोरला' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा व लिहा.

अ) धाकटा ब) छोटा क) मोठा ड) मधला

२) 'पहाट' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा व लिहा.

अ) निशा ब) प्रभात क) दुपार ड) अंधार

३)'सावली' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा व लिहा.

अ) गर्दी ब) छाया क) हर्ष ड) विरळ

**आ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही २)** **२ गुण**

१) फायदा ×.......... या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द शोधा व लिहा.

अ) नफा ब) आवक क) जास्त ड) नुकसान

२) मित्र ×.......... या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द शोधा व लिहा.

अ) सखा ब) बंधू क) तात ड) शत्रू

३) आवड ×.......... या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द शोधा व लिहा.

अ) निवड ब) नावड क) नावाडी ड) अनावड

**इ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही २)** **२ गुण**

१) 'कागद' या शब्दाचे लिंग ओळखा लिहा.

अ) पुल्लिंग ब) स्त्रीलिंग क) नपुंसकलिंग ड) यापैकी नाही.

२) 'गाय' या शब्दाचे लिंग बदला.

अ) बैल ब) सांड क) म्हैस ड) वासरू

३) 'उंट' या शब्दाचे लिंग बदला.

अ) सियार ब) सांडणी क) सितार ड) ससाणा

**ई) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही २) २ गुण**

१) आमच्या गावाकडे <u>वाटा</u> जातात.(अधोरेखित शब्दाचे वचन बदला.)

अ) वाटी ब) वाटू क) वाट ड) बोटा

२) 'गोष्ट' या शब्दाचे वचन ओळखून लिहा.

अ) त्रिवचन ब) बहुवचन क) एकवचन ड) अनेकवचन

३) 'तक्रार' या शब्दाचे अनेकवचन लिहा.

अ) अडचणी ब) समस्या क) तक्रारी ड) शांतता

**उ) सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही २) २ गुण**

१) गीता अभ्यास करते. (वाक्याचा काळ ओळखा)

२) त्याने पुस्तक वाचले असेल. (वाक्याचा काळ ओळखा)

३) खूप जोरात पाऊस पडत होता. (वाक्याचा काळ ओळखा)

Sample Paper
Prabhat Kids School,
Akola

## <u>विभाग -क (पाठ्यपुस्तक)</u>

**प्रश्न ५ : अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४) ४ गुण**

१) कोकणातला निसर्ग पाहून काय करावेसे वाटते?

२) वरंधा घाटातील टपऱ्या कोणाच्या सोबतीने उभारल्या आहेत?

३) आपल्या देशाचे राज्य कशामुळे सुरळीत चालते?

४) कर्णिका कोणते कार्य करते?

५) नदीकाठचे दगड कशामुळे गुळगुळीत झाले होते?

**आ) रिकाम्या जागा भरा. (कोणतेही ४) ४ गुण**

१) पावसाळ्यातील धमाल मनाला उभारी देणारा __________ कधी संपूच नये असे वाटते.

(प्रवास, रस्ता, मार्ग, दिवस)

२) सर्वांचीच _________ तयारी होती. (भेटण्याची, रुसण्याची, संपाची, भांडण्याची)

३) _____________ मुळेच माणसांच्या जीवनात अर्थ आहे.

(कर्णिके, जिव्हाताई, नासिके, नयन कुमार)

४) निसर्गाच्या विरोधात न जाता _____________ राहणं फायदेशीर आहे .

(सोबत, सानिध्यात, मर्जीत, बाजूला)

५) ____________ नाहीत म्हणून अडून बसण्याचे कारण नाही .

(साधनं, ऐकत, आवडी, अपेक्षा)

**इ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही १) ३ गुण**

१) 'घाटात घाट वरंधा घाट, बाकी सब घाटीयाँ!' असे लेखकाने का म्हटले असावे? तुमचे मत लिहा.

२) 'आपण सगळे शरीरासाठी राज्याचे सेवक आहोत.' या विधानाबाबत तुमचे मत मांडा.

**ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील दिलेल्या वाक्यात उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.५ गुण**

(मदत करणे, उत्तेजन देणे, पराजय होणे, जतन करणे, घाम गाळणे, खुलासा करणे)

१) आजीचा बटवा आईने सांभाळून ठेवला आहे.

२) क्रिकेट खेळाडूंना जिंकण्यासाठी प्रेक्षकांनी प्रोत्साहन दिले.

३) शेतकरी शेतात खूप कष्ट करतो.

४) देश कार्यासाठी प्रत्येक नागरिकांनी हातभार लावायला हवा

५) कारगिलच्या युद्धात पाकिस्तानचा पराभव झाला.

**प्रश्न ६ : अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४) ४ गुण**

१) कवीने वर्णिलेली प्रतिभेची प्रभात कुठे होणार आहे?

२) कवीने कष्टकऱ्यांना कोणते नाव दिले आहे?

३) देशाला उन्नत बनवण्याकरता आवश्यक असलेल्या बाबी कोणत्या?

४) कवितेत कष्टकऱ्यांचे अभंग नाते कोणासोबत आहेत?

५) कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील?

Sample paper
Prabhat Kids School,
Akola

**आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. (कोणतेही ४) ४ गुण**

१) आभाळाची अम्ही __________ काळी माती आई. (मुलगे, संत, लेकरे, पोर)

२) मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या _________ (मनात, गावात, युगात, शहरात)

३) भव्य पटांगण, बाग मनोहर, फुलपाखरांचे_______ सुंदर. (घर, विश्व, जग, अस्तित्व)

४) माणुसकीचे _________ नाते. (अनेक, विविध, अभंग, अनंत)

५) हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या ___________ नभात. (गावाच्या, शेताच्या, युगाच्या, नावाच्या)

**इ) कवितेच्या ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा. (कोणतेही १) २ गुण**

१) पायाभरणी अस्तित्वाची, प्रयोगशाळा व्यक्तित्वाची, तन सुदृढ, मन विशाल होई, इथे रुजवणूक त्या तत्वाची.

२) इमान आम्हा एकच ठावे, घाम गाळूनी काम करावे.

## विभाग -ड (उपयोजित लेखन)

**प्रश्न ७ : अ) खाली दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर निबंध लिहा. ६ गुण**

**१) माझा आवडता खेळ.**

मुद्दे:- तो कसा खेळतात --- तो खेळ का आवडतो? -------- तुमचे प्रेरणास्थान ----- त्या खेळातील तुमचे कौशल्य कसे वाढवाल------ खेळात मिळणारा आनंद.

**२) मी नदी झाले तर.......**

मुद्दे:- निळेशार पाणी ------ नदी प्रसन्न मन ---- नदी व्हावे वाटते --- मजा येईल ---- माझा उगम --- माझे रूप --- गावागावातून वळण --- शेती भाती पिकवेन--- धरण बांधणे---- मी जीवन वाहिनी असेल --- वाहत वाहत शहरात जल प्रदूषण ----- माझे रूप सुंदर असावे अशी माझी इच्छा ---जपवणूक करायला हवी.

**आ) खाली दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर कथालेखन करा. कथेला शीर्षक व तात्पर्य लिहा. ६ गुण**

१) मुद्दे:- एक तलाव --बेडूक व पिल्ले ---बैल मोठा प्राणी ---बेडकाचे फुगणे -----तो मोठा की मी मोठा----एवढा मोठा --नाही --एवढा मोठा ---नाही ---अखेर शरीर फुटणे --तात्पर्य.

२) एक हुशार विद्यार्थी----- सर्वांचा लाडका --परीक्षेत, खेळात, हुशार -----गर्वाची बाधा ----- खेळात वेळ घालवतो ---परीक्षा जवळ येते ---अभ्यास कर --मला सर्व येते --पेपर लिहिताना काहीच आठवत नाही ----खूपच कमी गुण -------पश्चाताप---- गर्वाचे घर खाली.

**इ) खालील दिलेल्या कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा. ५ गुण**

१) पंकज /प्रतिभा पाटील, क्रीडा प्रतिनिधी, शारदा विद्यामंदिर, नागपूर, ४०२१०९ येथून श्री धनंजय माने मेट्रो स्पोर्ट स्टोअर जिल्हा नागपूर, क्रीडा साहित्य विक्रेत्याकडे आवश्यक क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.

२) अनुप/अदिती जाधव विद्यार्थी प्रतिनिधी सावित्रीबाई फुले विद्यालय, अकोला हा/ही शाळेच्या बसचे बस चालक खूप वेगाने गाडी चालवत असतात याविषयी तक्रार करणारे पत्र शाळेच्या वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांना लिहा.

---------

Sample Paper Prabhat Kids School, Akola